**विशेष दिवाणी दावा क्रमांक ४४/२०२२.**
**नि.क्र. ४६.**

**निशाणी क्र.६४ वरील पारित आदेशानुसार वादीतर्फे साक्षीदार क्र. ०१ विलास केशव शेळके यांचा उलटतपास प्रतिवादी क्र. ८ चे विधीज्ञ श्री. के. डी. दारोळे यांचेमार्फत शपथेवर सुरु :—**

०५. मी सर्व प्रतिवादींना लहानपणापासुन चांगल्याप्रकारे ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी नं.१ विनायक माझे मोठे बंधु असुन ते इयत्ता आठवीत असतांना त्यांना अपंगत्व आले. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी नं.१ ने एम.पी.एस.सी. परिक्षा पास होवुन मंत्रालयात नोकरी मिळवली. हे म्हणणे खरे नाही की, नोकरी मिळाल्यानंतर प्रतिवादी नं.१ ने आम्हा सर्व भावा बहिणींचा सांभाळ केला. हे म्हणणे खरे आहे की, माझा पुर्वीपासुन आजपर्यंत वाहन चालविण्याचा व्यवसाय आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी नं.१ विनायक हा आधुनमधुन गावाकडे येवून शेतीकडे लक्ष देत होता. हे म्हणणे खरे नाही की, मी श्रीरामपुर येथे एका रूग्णालयात वाहनचालक म्हणुन नोकरीवर असतांना माझे तेथील कर्मचा—यांशी पटत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मला दारूचे व्यसन होते व त्यामुळे माझे इतर कर्मचा—यांशी वाद होत असे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मला माझा नोकरीचा राजीनामा द्यावा लागला. हे म्हणणे खरे नाही की, नोकरीचा राजीनामा दिल्यामुळे मला आर्थिक अडचण निर्माण झाली व त्यामुळे प्रतिवादी नं.१ ने मला अहमदनगर येथुन एक महिंद्रा मार्शल चारचाकी गाडी विकत घेवुन दिली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलीच्या लग्नाचा खर्च सर्व प्रतिवादींनी केला. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी नं.१ ने सेवानिवृत्तीनंतर गावी येवुन आमच्या शेतीतील सर्व काटे झुडपे काढुन शेती लागवडीखाली आणली. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी नं.१ सेवानिवृत्तीनंतर गावी येण्यापुर्वी आमची वडिलोपार्जित जमिन मीच वहिती करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी नं.१ ने आमचे गावाकडील जुने घर पाडुन मोठा बंगला बांधला. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी नं.८ माया हिचा देखील विवाह प्रतिवादी नं.१ नेच केला. हे म्हणणे खरे आहे की, माझे व प्रतिवादी नं.१ चे वाद झाल्यानंतर आम्ही तंटामुक्ती अध्यक्षांना घरी

बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आमच्यात समझोता होवुन दावा मिळकतीच्या दक्षिणेकडील पहिली वाटणी मला देण्यात आली व प्रतिवादी नं.८ माया हिला दक्षिणेकडुन दुसरी वाटणी देण्यात आली. हे म्हणणे खरे नाही की, तुकडेबंदी कायद्याची बाधा येत असल्याने प्रतिवादी नं.२ ते ७ यांनी हक्कसोडपत्र करून दावा मिळकतीमधील त्यांच्या हिश्याची मिळकत प्रतिवादी नं.१ च्या लाभात करून दिली. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१४ नंतर मी कुठलाही कामधंदा करीत नव्हतो. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, मी शेती करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१४ मध्ये राजीनामा दिल्यानंतर मला मिळालेल्या रकमेचा मी माझ्या शेतीवर, कुटूंबावर व मुलांवर खर्च केला. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पुराव्याकामी प्रतिज्ञालेखात लिहीलेला सर्व मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**सा.वा.दा.ब.अ.क.के.** **श्रवणोत्तर स्विकृती**

JOSHI PRASAD BALKRISHNA

Digitally signed by JOSHI PRASAD BALKRISHNA
Date: 2025.10.10 17:44:28 +0530

**दिवाणी न्यायाधीश व.स्तर, संगमनेर.**
**दि. १०/१०/२०२५.**

**( पी.बी. जोशी )**
**५वे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**संगमनेर.**